**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# कोंडी

संपूर्ण ऑगस्ट महिना सार्वत्रिक अस्वस्थतेने जणू ग्रासलेला होता. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अशा तीनही आघाड्यांवर ही अस्वस्थता नांदली. वॉशिंग्टन, लंडन आणि नवी दिल्ली अशा, जगाच्या विकसित तसेच विकसनशील या उभय पट्ट्यांतील महत्त्वाच्या तीन देशांच्या राजधान्या अस्वस्थता आणि तिच्या हातात हात घालून आलेल्या असंतोषाने गजबजलेल्या, लपेटलेल्या होत्या. तिन्ही राजधान्यांमध्ये दर्शन घडले ते प्रचंड आणि व्यापक जनक्षोभाचे. 'व्यवस्था'नामक गोष्टीबाबतच्या प्रगाढ संतापाची या जनक्षोभाला एकीकडे गडद किनार होती, तर, दुसरीकडे भयव्याकुळतेचे घनअस्तर त्याला लगडलेले होते. कर्जउभारणी करण्याबाबत अमेरिकी सरकारला घालून देण्यात आलेली कमाल मर्यादा उंचावण्यासंदर्भात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांदरम्यान एकमत होण्याबाबतची अखेरच्या क्षणापर्यंत ताणली गेलेली चिंतायुक्त उत्कंठा आणि त्या पाठोपाठच अमेरिकी कर्जरोख्यांचे घटविण्यात आलेले पतमानांकन अशा दुहेरी हाद-यांपायी उभा जागतिक समुदाय संभाव्य आर्थिक मंदीच्या भयगंडात दुस-यांदा लोटला गेला. या मानसिक हाद-यातून वैश्विक मन सावरते न सावरते तोच, लोकशाहीची जननी म्हणून गौरविल्या जाणा-या ब्रिटनची शान असलेली राजधानी लंडन अलीकडच्या इतिहासात कधीच न अनुभवलेल्या अशा सामाजिक विस्फोटाच्या आणि त्यांतून प्रसवलेल्या हिंसाचाराच्या लाटांनी लपेटली गेली. ब्रिटनमधील तरु णाईच्या मनात कारणपरत्त्वे साचत आलेल्या संतापाची आग लंडन, मँचेस्टर, लीड्स्... अशा शहरांमधील रस्तोरस्ती बघताबघता पसरली. तब्बल एक आठवडा भडकलेल्या त्या ज्वाळांनी सार्वजनिक मालमत्तेचा घास तर मोठ्या प्रमाणावर घेतलाच पण, सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, त्या अग्नितांडवात आहुती पडली ती 'ब्रिटन' या नावाबरोबर आजवर जपल्या गेलेल्या त्या देशाच्या 'ग्रेट' अशा प्रतिमेची ! कशाबशा शांतवलेल्या त्या वणव्याची धग त्या नंतर अल्पावधीतच पुन्हा भडकली ती त्याच ब्रिटनची एकेकाळची वसाहत असलेल्या भरतभूमीमध्ये. 'लोकपाल' विधेयकाच्या निमित्ताने रामलीला मैदानावर



प्रकटलेल्या लोकमागणीच्या वणव्यात घास पडला तो 'सरकार'नामे शक्तीच्या हटवादाचा. अवघ्या एका महिन्यात व्यापक जन-अस्वस्थतेचे आणि जनापेक्षांचे हे तीन आयाम तीन ठिकाणी तीन प्रकारे साकारले. स्वरू पतःच गतिमान असणा-या आणि तरु णाईचे व्यवच्छेदक लक्षण गणल्या जाणा-या उर्ध्वगामी ऊर्जेने उफाणणा-या तरू ण अपेक्षांची योग्य ती बूज राखण्याबाबत विद्यमान राजकीय व्यवस्था व नेतृत्त्वाला येत असलेल्या अपयशाची प्रातिनिधिक प्रचीती लंडन आणि नवी दिल्ली येथील घटनाक्रमाने जगासमोर मांडलेली आहे. झपाट्याने बदलत असलेले वैश्विक अर्थवास्तव, वाढती अनिश्चितता, जगभर साकारत असलेली एक नवीनच वर्गव्यवस्था, त्या वर्गीय व्यवस्थेतील ताणतणाव, त्यांतून प्रत्यही निर्माण होत असलेली नवनवीन आव्हाने, वेगाने पालटत असलेली मूल्यव्यवस्था... अशा सगळ्या बाबींचे योग्य भान राखून त्यांचा सुविहित मेळ बसविण्यासाठी आवश्यक असणा-या प्रगल्भतेची सार्वत्रिक वानवा आज प्रकर्षाने जाणवते. आजची मुख्य कोंडी हीच तर दिसते. आज आपल्या जीवनात ठायीठायी उद्भवणा-या बहुमिती संघर्षाची सारी बीजे या कोंडीतूनच धुमारत आहेत. या परिस्थितीत, सर्वाधिक जबाबदारीची आणि तितकीच संवेदनशील भूमिका बजावायला लागेल ती शिक्षणक्षेत्राला आणि कुटुंबसंस्थेला. हे जटिल आव्हान स्वीकारण्यास या दोन व्यवस्था सक्षम बनविण्याचे व्रत आपल्या सगळ्यांना घ्यावे लागणार आहे. ■■

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

शिक्षण

# चिनी खाजगी शिक्षण

चीनमध्ये सध्या शिक्षणविषयक घडामोडींना वेग आला आहे. आशियातील सुपरपॉवर बनू इच्छिणा-या चीनमध्ये खाजगी शिक्षणाकडे लोकांचा कल वाढतो आहे. आपल्या पाल्यांना उत्तम व दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी चिनी पालक प्रयत्नशील आहेत. खरे तर चीनमधील शिक्षणाची परंपरा तशी फार जुनी आहे. अगदी इतिहासकाळापासून चीनमध्ये शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले होते. शांग राजघराण्याच्या कारकिर्दीत (ख्रिस्तपूर्व १६ वे ते ११ वे शतक) चिनी लिपीचा विकास झाला. Xio म्हणजे शाळा, Xue म्हणजे अभ्यास आणि Daxue म्हणजे उच्च माध्यमिक शाळा असे शब्दप्रयोग चीनमध्ये फार पूर्वीपासून केले जात होते. त्या काळी अस्तित्वात असलेल्या शिक्षणव्यवस्थेत दैनंदिन कामकाजविषयक शिक्षण (Guan xue) देण्यात येत असे. धनुर्विद्या, गणित, शिष्टाचार, लेखन इत्यादी विषय तिथे पूर्वीपासून शिकविले जात होते.

या नंतर Zhou राजघराण्याच्या काळापासून (ख्रिस्तपूर्व ११वे शतक ते ७७१) हान राजघराण्याच्या काळापर्यंत (ख्रिस्तपूर्व २०६ ते इसवी सन २२०) चीनमध्ये शिक्षण, तत्त्वज्ञान अशा अनेक विषयांत प्रगती होत गेली. चिनी विद्वान व तत्त्ववेत्ता कन्फ्युशियस याच काळातील (ख्रिस्तपूर्व ५५१ ते ४७९). चीनमधील शिक्षणव्यवस्थेत आजही कन्फ्युशियानिझमचा मोठा प्रभाव आहे. 'शिक्षण सर्वांसाठी' आणि 'प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार शिक्षण' याला कन्फ्युशियसने प्राधान्य दिले. शिक्षणाच्या संदर्भात हे दोन मुद्दे आजही महत्त्वाचेच ठरतात. त्या काळी चीनमध्ये खाजगी शाळा होत्या हे इथे उल्लेखनीय ठरते. कालांतराने चीनने पाश्चात्य शिक्षणपद्धती स्वीकारली, तरी, आपली शिक्षणविषयक मूल्ये व परंपरा चीनने ब-याच प्रमाणात जपली. विसाव्या शतकाच्या मध्यास प्रस्थापित झालेल्या साम्यवादी राजवटीमुळे चीनमधील खाजगी शिक्षण मागे पडले.



आता चीनमध्ये पुन्हा एकदा खाजगी शिक्षणाला सोनेरी दिवस आले आहेत. चिनी नागरिक खाजगी शिक्षणाला पसंती देत असल्याचे चित्र आहे. चीनमधील शिक्षण मंत्रालयाच्या माहितीनुसार २००८मध्ये विविध प्रकारचे शिक्षण, प्रशिक्षण देणा-या सुमारे ५ लाख ७९हजार संस्था चीनमध्ये होत्या. त्यांपैकी सुमारे सव्वा लाख संस्था खाजगी आहेत. बालवाडी, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण - तंत्रशिक्षण इत्यादी अनेक प्रकारच्या संस्थांचा यात समावेश होतो. सुमारे ४ कोटी विद्यार्थी या खाजगी संस्थांमधून शिक्षण घेत होते. त्यांपैकी सुमारे ८३ लाख मुले व्यावसायिक व तंत्रशिक्षण घेत होती. महाविद्यालयीन शिक्षण घेणा-या चिनी मुलांची संख्या २००५ ते २००८ या काळात सुमारे २० टक्क्यांनी वाढली. २००८ ते २०१३ या काळात चीनमधील शिक्षण-प्रशिक्षणावरील खर्चात प्रतिवर्षी किमान २० टक्के वाढ होण्याचा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. शिक्षणावरील खर्च येत्या दोन-तीन वर्षांत ४.१ ट्रिलियन युवान (चिनी चलन) इतका होण्याचा अंदाज असून त्यांपैकी सुमारे ३.२ ट्रिलियन युवान म्हणजे ७८ टक्के खर्च हा खाजगी शिक्षणावर होण्याची चिन्हे आहेत. शिक्षणाच्या बाजारपेठेत पाय घट्ट रोवून उभ्या असलेल्या खाजगी शैक्षणिक संस्था price-to-earnings या तत्त्वानुसार कार्य करीत आहेत. या संस्थांना मिळणारा एकूण नफा १४ ते ८० टक्के या दरम्यान आहे. त्यामुळे शिक्षणविषयक बाजारपेठेत विविधता आढळते. लहान, मध्यम व मोठ्या संस्था या सर्वांना बाजारपेठेत स्थान आहे.

एकेकाळी मागे पडलेले खाजगी शिक्षण आता पुन्हा शिक्षणव्यवस्थेत स्थान मिळवून आहे आणि चिनी सरकार याबाबत विरोधी भूमिका घेत नसल्याचे चित्र तेथे आहे. कारण, सर्वांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी चिनी सरकार प्रयत्नशील आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक फी-माफी वा तत्सम योजना राबवायच्या झाल्यास शहरांतील विद्यार्थ्यांवर होणा-या खर्चात कपात झाली तर चिनी सरकारला ते उपकारकच ठरते आहे. शिवाय, शहरांतील पालकांचा ओढा खाजगी शिक्षणाकडे आहे. त्यामुळे शहरांतील विद्यार्थ्यांना खाजगी शिक्षण मिळाले तर पालक व सरकार दोघांनाही ते हवे आहे.

नावाजलेल्या खाजगी शाळांसाठी प्रतिवर्षी सुमारे तीन ते चार हजार अमेरिकी डॉलर इतका खर्च करण्याची चीनमधील आर्थिकदृष्ट्या संपन्न गटातील पालकांची तयारी आहे (चीनमधील कारखान्यातील कामगारांचे वार्षिक वेतन साधारणपणे एवढेच असते). आर्थिक उदारीकरणाच्या काळात पालकांना उपलब्ध झालेल्या नोक-यांच्या संधी आणि एका अपत्यावरच थांबण्याचे धोरण यांमुळे त्यांना असा खर्च करणे शक्य होत आहे. या शिवाय, चीनमध्ये खाजगी शिकवण्यांनाही मोठी मागणी आहे. त्यामुळे खाजगी क्लासेसची वाटचालही जोमाने चालू आहे. वेगवेगळ्या परीक्षांसाठी मुलांची तयारी करून घेणा-या शिक्षणसंस्थांमध्येही प्रवेशासाठी झुंबड उडत असल्याचे चित्र आहे.

खाजगी शिक्षणासंबंधीची बाजारपेठ विस्तारत असतानाच त्यात गुंतवणूक करण्यासाठी गुंतवणुकदारांनी पुढाकार घेतला आहे. खाजगी शिक्षणाचा पसारा वाढत असतानाच न्यूयॉर्कच्या शेअरबाजारात नोंदणी करण्यासाठी शिक्षणक्षेत्रातील काही चिनी कंपन्या पुढे आल्या आहेत. या कंपन्यांची उलाढाल फार मोठी आहे. New Oriental ही त्यातीलच एक. खाजगी शिक्षणक्षेत्रातील सर्वांत मोठी कंपनी असलेल्या New Orientalची सेवा चीनमध्ये अनेक ठिकाणी पोहचली आहे. विद्यार्थ्यांची संख्या आणि अनेकानेक प्रकारचे अभ्यासक्रम यांत ही संस्था आघाडीवर आहे. इंग्रजी भाषेचे शिक्षण-प्रशिक्षण ही चिनी विद्यार्थ्यांची फार मोठी गरज असून त्यासाठी चिनी विद्यार्थी New Orientalला प्राधान्य देतात. अमेरिकेत शिकायला जाऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांची अन्य विषयांची तयारीदेखील या खाजगी क्लासद्वारे होत असते. या कंपनीच्या निव्वळ मिळकतीने सुमारे ३९ कोटी अमेरिकी डॉलर इतका मोठा टप्पा गाठला आहे. इंग्रजी भाषा शिकविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या English First या कंपनीचीही उलाढाल मोठी आहे. या कंपन्यांशिवाय Xueda आणि TAL या दोन चिनी कंपन्यांनीही न्यूयॉर्कच्या शेअरबाजारात स्थान मिळविले आहे. दर्जेदार शिक्षणाची गरज आणि पालकांच्या वाढत्या अपेक्षा यांमुळे खाजगी शिक्षणक्षेत्राला एकंदरीत चांगले दिवस आले आहेत. मिळालेल्या संधीचा चांगला उपयोग करून घेण्यासाठी कंपन्या प्रयत्नशील आहेत.



शिक्षणाबाबत विद्यार्थीही चांगलेच जागरुक झाले आहेत आणि यासाठी ते इंटरनेटचा व मोबाइलचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेत आहेत. वेगवेगळ्या क्लासेसमधील शिक्षणाच्या दर्जाबाबत विद्यार्थी ब्लॉग्ज आणि एसएमएसद्वारा बोलत आहेत. त्यामुळे शिक्षणसंस्थांमधील वातावरण, शिकविण्याच्या पद्धती, साधने आणि शिक्षकांचा दर्जा या सर्वच बाबी महत्त्वाच्या ठरत आहेत. विद्यार्थी टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यांना आकर्षित करण्यासाठी शिक्षणसंस्थांमध्ये स्वाभाविकच स्पर्धा वाढू लागली आहे. इंटरनेटच्या माध्यमातून शिक्षणसंस्था जाहिरात करत आहेत. आपल्या 'ब्रँड'ला अधिक पसंती मिळावी यासाठी कंपन्या प्रयत्नशील आहेत. जागतिकीकरणाच्या काळात आपली मुले मागे पडू नयेत, अशी पालकांची भावना असून त्यासाठी आपल्या पाल्यांना लहान वयापासून इंग्रजी भाषा यावी अशी पालकांची अपेक्षा आहे. ती पूर्ण करण्यासाठी New Orientalने Grade six पासून 'पॉप किड्स् इंग्लिश' (पहिलीपासून इंग्रजीसारखा?) असा उपक्रम चालू केला आहे. शिक्षण व्यवसायाची एक महत्त्वाची बाजू म्हणजे हा व्यवसाय श्रमाधिष्ठित आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी घेतलेले श्रम हे इथे सर्वांत महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे चांगले शिक्षक मिळविणे व ते टिकवून ठेवणे ही शिक्षणसंस्थांसाठी प्राधान्याची बाब ठरली आहे. सरकारी शाळांमधील शिक्षकांनी कंत्राटी पद्धतीने शिकवावे, असा प्रयत्न खाजगी कंपन्यांनी केला आहे.

दरम्यान, चीनमध्ये पदवीधारकांची संख्या वाढली असून त्यांच्यासाठी रोजगार हा विषय महत्त्वाचा ठरू लागला आहे. तसेच, या काळात चीनमध्ये विरोधाभासी चित्रही निर्माण झाले आहे. एकीकडे, चीनच्या आर्थिक प्रगतीची घोडदौड लक्षात घेता चीनमध्ये मनुष्यबळाची गरज भासते आहे, तर दुसरीकडे, योग्य पदासाठी योग्य कौशल्ये असणारे उमेदवार शोधणे कंपन्यांसाठी अवघड बनले आहे. त्यामुळे मनुष्यबळ आहे, रोजगाराच्या संधी आहेत पण योग्य उमेदवारांअभावी कंपन्या अडचणीत, अशी स्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः, व्यावसायिक कौशल्ये असणा-यांची कमतरता चिनी कंपन्यांना जाणवते आहे. चीनमधील शिक्षणक्षेत्रातील धुरीण याही प्रश्नाचा विचार करतील अशी आशा आहे. ■■

**शिक्षण**

# संघर्षात अडकली वाट शिक्षणाची

जागतिकीकरणाच्या काळात विस्तारलेल्या शिक्षणाच्या बाजारपेठेत नवनवीन शिक्षणाच्या शेकडो संधी उपलब्ध झाल्या असल्या तरी शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांची संख्या आजही लाखोंच्या घरात आहे. किमान प्राथमिक शिक्षणही अनेकांना मिळू शकलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच 'सर्वांसाठी शिक्षण' हे उद्दिष्ट गाठण्यापासून जग अजून दूरच आहे, असा निष्कर्ष 'युनेस्को'च्या (युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशन - UNESCO) यंदाच्या या विषयाशी संबंधित आंतरराष्ट्रीय अहवालातून काढण्यात आला आहे. विशेषतः, सशस्त्र संघर्षाला सामोरे जावे लागणा-या देशांमध्ये शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. म्हणून, या देशांमधील सरकारांनी त्वरित सुयोग्य कृती करणे अत्यावश्यक आहे, असे या अहवालाने नमूद केले आहे.

'आहे रे' आणि 'नाही रे' या दोन गटांतील शिक्षणाच्या संदर्भातील विषमतेची दरी कमी करण्यासाठी 'सर्वांसाठी शिक्षण' ही चळवळ 'युनेस्को'तर्फे १९९०मध्ये हाती घेण्यात आली. थायलंडमध्ये झालेल्या पहिल्या परिषदेत, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे आणि साक्षरतेचे प्रमाण वेगाने वाढविणे यांवर भर देण्याचे ठरविण्यात आले होते. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला सहस्रकाची विकास उद्दिष्टे (millenium development goals) निश्चित करण्यात आली होती. 'सर्वांसाठी शिक्षण' हे उद्दिष्ट त्या सर्व उद्दिष्टांशी सुसंगत असेच होते. ही सर्व उद्दिष्टे २०१५पर्यंत पूर्ण करण्याचे ध्येय तेव्हा समोर ठेवण्यात आले होते. या उद्दिष्टांपर्यंत पोहचण्यासाठी काही योजना आखून त्यानुसार कृती करण्यात येत आहे. त्यांद्वारे विकसनशील आणि गरीब देशांमधील मुलांना शिक्षणाच्या व आरोग्याच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. याबाबत गेल्या दशकात झालेल्या प्रगतीची नोंद घेणे गरजेचे ठरते.




शाळाबाह्य मुलांची संख्या घटत असली तरी ही घट मंदगतीने होते आहे. २००८मध्ये शाळाबाह्य मुलांची संख्या ६७ लाख होती, २०१५पर्यंत ही संख्या वाढण्याची शक्यता आहेच. दक्षिण व पश्चिम आशियातील शाळाबाह्य मुलांची संख्या निम्म्याने कमी झाली. काळजीचा मुद्दा असा की, प्राथमिक शिक्षण पूर्ण न करू शकणा-या शाळाबाह्य मुलांची संख्याही भरपूर असून सब-सहारन आफ्रिकेत तर अशी लाखो मुले आहेत. लहान मुलांच्या आरोग्याबाबत काही सुधारणा घडून आल्या असून पाच वर्षांखालील मुलांच्या मृत्यूच्या संख्येत घट झाली आहे. १९९०मध्ये ही संख्या १ कोटी २५ लाख इतकी होती. ती २००८मध्ये ८८ लाखापर्यंत खाली आली. १९९९ ते २००८ या काळात प्राथमिक शिक्षण घेणा-या मुलांची संख्या ५२ लाखांनी वाढली. प्राथमिक शिक्षणासाठी नोंदणी करणा-या मुलींची संख्याही वाढल्याने 'जेन्डर गॅप' कमी झाली.

***जगातील निम्म्यापेक्षा जास्त शाळाबाह्य मुले फक्त १५ देशांमध्ये आहेत.***

*२००८मध्ये 'शाळाबाह्य' अशी नोंदणी झालेल्या निवडक देशांमधील मुलांची संख्या खालील आलेखात दर्शविण्यात आली आहे.*


*(संदर्भ - एज्युकेशन फॉर ऑल ग्लोबल मॉनिटरिंग रिपोर्ट, २०११)*



असे असले तरी सर्वांपर्यंत शिक्षण व आरोग्य पोहचलेले नाही, ही वस्तुस्थिती आहेच. विकसनशील देशांमधील कुपोषणाचा प्रश्न अद्याप गंभीर आहे. या देशांमधील पाच वर्षे वयाखालील दर तीनमधील एक मूल कुपोषणग्रस्त आहे. कुपोषणामुळे मुलांचा मेंदूविकास खुंटतो. त्यांच्या आकलनक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. शिक्षणाच्या संदर्भात हा परिणाम आयुष्यभर टिकणारा असतो. त्यामुळे शिक्षणाच्या बाबतीत त्यांच्या आरोग्याची कधीही न भरुन येणारी हानी होते.

एकीकडे संगणक साक्षरता गरजेची बनली असल्याचे चित्र असले तरी जगातील प्रौढ व्यक्तींमधील १७ टक्के प्रौढ नागरिक वाचन-लेखन हे मूलभूत कौशल्य प्राप्त करू शकलेले नाहीत. यांतील दोन-तृतीयांश स्त्रिया आहेत.

***अशिक्षित असलेले बहुसंख्य प्रौढ नागरिक खालील दहा देशांमध्ये असून २००५-२००८ या काळातील त्यांची संख्या (दशलक्षांत) खालीलप्रमाणे***




मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न इथे महत्त्वाचा ठरतो. जगभरातील विविध समाजगटांमध्ये लिंगभाव-समानता (जेन्डर इक्वालिटी) रुजली असती तर प्राथमिक शिक्षण घेणा-या मुलींची संख्या २००८मध्ये सुमारे ३६ लाखांनी वाढली असती. देशोदेशींमध्ये व्यापक प्रमाणावर असमानता असल्यामुळे संधींची उपलब्धता घटते. पाकिस्तानमधील गरीब कुटुंबांमधील ७ ते १६ वयोगटातील सुमारे निम्मी मुले शाळाबाह्य गटात मोडतात तर सधन घरांमधील फक्त ५ टक्के मुले या गटात मोडतात.



शिक्षण आणि आरोग्य या संदर्भात दखल घेण्यासारखा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत पोहचलेल्या महिला आपल्या व आपल्या अपत्यांच्या आरोग्याबाबत जागरुक असतात. विशेषतः, माता जर एडस् पॉझिटिव्ह असेल तर आपल्या अपत्याला एडस् होऊ नये यासाठी रोगप्रतिबंधक पावले उचलण्याबाबत ती सतर्क असते. मालावी येथे केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या सुमारे ६० टक्के स्त्रियांना अशा प्रकारच्या औषधोपचारांबाबत माहिती होती.

अनेक देशांमध्ये शिक्षणाच्या दर्जाचाही प्रश्न आहे. प्राथमिक शाळेत गेलेल्या सर्वच विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे वाचता-लिहिता येतेच असे नाही. साधी आकडेमोड करणेही अनेकांना जमतेच असे नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे, ही बाब यावरून अधोरेखित होते. शिक्षकांच्या संख्येचाही विचार इथे करावा लागतो. सर्वांसाठी शिक्षणाचे उद्दिष्ट २०१५पर्यंत गाठायचे असेल तर गरीब देशांमध्ये १९ लाख शिक्षकांची गरज असून त्यांतील निम्मे शिक्षक सब-सहारन देशांमध्ये असावे लागतील, असे तज्ज्ञांचे मत आहे.

**संघर्षग्रस्त देश व शिक्षण**

सर्वांसाठी शिक्षण हे उद्दिष्ट गाठण्यात संघर्षग्रस्त देश सर्वांत मागे पडले आहेत. म्हणून संघर्षग्रस्त देशांमधील शिक्षणाचा विचार गांभिर्याने केला पाहिजे. सशस्त्र संघर्षामुळे शिक्षण, आर्थिक विकास, गरिबी दूर करणे ही उद्दिष्टे तर गाठली जात नाहीत, उलट, हिंसाचारग्रस्त देशांमधील प्रश्न अधिकच गंभीर बनत जातात. २००१ ते २००८ या काळात जगातील ३५ देशांना सशस्त्र संघर्षांना सामोरे जावे लागले. त्यांतील ३० देश हे निम्न उत्पन्न वा निम्न-मध्यम उत्पन्न गटातील होते. निम्न उत्पन्न गटातील संघर्षाचा काळ हा सरासरी १२ वर्षे इतका होता. संघर्षग्रस्त देशांमधील प्राथमिक शिक्षण घेण्याच्या वयातील सुमारे २८ लाख मुले शाळाबाह्य आहेत. शाळाबाह्य मुलांची जागतिक पातळीवरील संख्या लक्षात घेतली तर हे प्रमाण सुमारे ४२ टक्के इतके आहे. अन्य गरीब देशांतील मुलांच्या तुलनेत संघर्षग्रस्त देशांमधील मुले लहान वयात दगावण्याच्या शक्यता दुपटीने वाढतात. कुपोषण, अनारोग्य व हिंसा ही कारणे यामागे असतात.

अन्य गरीब देशांमधील तरुणांमधील साक्षरतेचे प्रमाण सुमारे ९३ टक्के असल्याचे आढळते तर सतत युद्ध व हिंसाचाराला सामोरे जाणा-या देशांमध्ये हे प्रमाण सुमारे ७९ टक्के इतके असते. अनेकदा हिंसाचारात निष्पाप नागरिकांची व पायाभूत सोयी-सुविधांची फार मोठी हानी घडून येते. शालेय शिक्षणावर त्याचा परिणाम होतो. संघर्षामुळे कोट्यवधी नागरिक विस्थापित झाले आहेत. अशा विस्थापितांसाठी असलेल्या छावण्यांमधील, प्राथमिक शाळेच्या वयोगटातील एकूण मुलांपैकी केवळ ६९ टक्के मुले प्राथमिक शाळेत जात असल्याचे चित्र २००८मध्ये दिसले.

**निधी हवाच**

शिक्षणासाठी उपलब्ध होणारा निधी हाही संघर्षग्रस्त देशांमध्ये एक काळजीचा मुद्दा असतो. जागतिक अर्थव्यवस्था अडचणीच्या काळातून जात असताना सर्वच देश कोणत्या ना कोणत्या ना प्रकारे अडचणीत येत असतात. अशा वेळी गरीब व विकसनशील देशांमधील आर्थिक ताण वाढून त्याचा परिणाम शिक्षणव्यवस्थेवर होऊ शकतो. त्यातच, शिक्षणासाठी निधी उपलब्ध करून देणारे देश व अन्य संस्थाही अडचणीत आलेले असतात. त्यामुळे मदतीसाठी असलेल्या त्यांच्या निधीतही घट होते. तरीदेखील गेल्या काही वर्षांत शिक्षणासाठी अधिक निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न काही देशांनी केला आहे.

निम्न उत्पन्न गटातील देशांनी शिक्षणासाठी असलेला राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १९९९पासून हळूहळू वाढविला आहे. तो साधारणपणे २.९ टक्क्यांपासून ३.८ टक्के इतका वाढला आहे. तरीदेखील मध्य आशिया आणि दक्षिण व पश्चिम आशियातील काही देशांनी शिक्षणाकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही. प्राथमिक शिक्षणासाठी असलेल्या मदतनिधीत २००२पासून वाढ झाली असून तो आता सुमारे ४.७ अब्ज अमेरिकी डॉलर इतका झालेला आहे. तरीदेखील अजून १६ अब्ज अमेरिकी डॉलर इतक्या निधीची आवश्यकता आहे. शिक्षणासाठी मदत करणा-या संस्थांचा कल उच्च शिक्षणासाठी निधी उपलब्ध करून देण्याकडे असतो. त्यातील निम्मा निधी प्राथमिक शिक्षणासाठी देण्यात आला तरी सुमारे दीड अब्ज अमेरिकी डॉलर इतका वाढीव निधी उपलब्ध होऊ शकतो.



**युद्ध, शिक्षण व खर्च**

शिक्षणावरील खर्च वाढविण्यामागे संघर्षग्रस्त देशांमध्ये एक मोठा अडसर उभा ठाकतो तो लष्करावरील खर्चाचा. युद्धासाठी सर्व प्रकारची साधने मिळविण्यासाठी व प्रत्यक्ष युद्धात होणारा खर्च यांना प्राधान्य देताना प्राथमिक शिक्षण मागे पडते. जगभरातील युद्धग्रस्त देशांपैकी सुमारे २१ देश शस्त्रे व युद्ध यांसाठी बराच खर्च करीत आहेत. शिक्षणासाठी उपलब्ध होणारा मदतनिधीदेखील जखमींवरील उपचार व अन्य बाबींसाठी वापरला जातो. युद्धावरील खर्चात १० टक्के जरी कपात झाली तर शिक्षणाला - विद्यार्थ्यांना त्याचा लाभ कसा होईल ते खालील तक्त्यात दिले आहे.

| | | |
|---|---|---|
| चड | ५.०% | ३,५०,००० |
| बुरुंडी | ४.९% | ७,००० |
| येमेन | ४.४% | ८,४०,००० |
| गिनिया बिसासू | ३.८% | ३४,००० |
| मॉरिशियाना | ३.७% | ७०,००० |
| अंगोला | ३.६% | ५,९०,००० |
| किर्गिजिस्तान | ३.०% | ४०,००० |
| **पाकिस्तान** | २.९% | **३६,००,०००** |
| व्हिएतनाम | २.५% | ४,३०,००० |
| अफगाणिस्तान | २.२% | ३,६०,००० |
| कांगो | २.१% | ५,४०,००० |
| माली | २.१% | १,५०,००० |
| युगांडा | २.०% | १,८०,००० |
| नेपाळ | १.९% | २,८०,००० |
| सिआरा लिओन | १.९% | ४०,००० |
| टोगो | १.९% | ७०,००० |
| इथिओपिया | १.७% | ६,५०,००० |
| बुरकिना फासो | १.३% | ९६,००० |
| कंबोडिया | १.१% | १,१०,००० |
| मध्य आफ्रिका रिपब्लिक | १.१% | २०,००० |
| **बांगलादेश** | १.०% | **१०,००,०००** |

⇦ लष्करावर होणा-या खर्चाची देशांतर्गत ठोकळ राष्ट्रीय उत्पादनाशी एकूण टक्केवारी

या खर्चात १० टक्के जरी कपात झाली आणि तो खर्च शिक्षणासाठी करण्यात आला तर प्रत्येक देशातील प्राथमिक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या किती वाढेल ते उजवीकडील रकान्यात दिले आहे. ⇨

**एकूण मुले ९५ लाख**

*(पृष्ठ ३४ वर पाहावे)*

पर्यावरण

# पर्वत, पर्यटन आणि पर्यावरण

छत्तीसगड, उत्तराखंड आणि झारखंड ही तीन नव्याने अस्तित्त्वात आलेली राज्ये येत्या नोव्हेंबर महिन्यात ११ वर्षांची होतील. २००० सालातील नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात अनुक्रमे मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहार या आकारमान आणि लोकसंख्येच्या दृष्टीने विशाल असणा-या तीन राज्यांचे विभाजन होऊन ही तीन नवीन राज्ये देशाच्या नकाशावर उदय पावली (छत्तीसगड - १ नोव्हेंबर २०००, उत्तराखंड - ९ नोव्हेंबर २००० आणि झारखंड १५ नोव्हेंबर २०००). राज्य आकारमानाने आटोपशीर असेल तर विकासाची प्रक्रिया तेथे अधिक सुबद्धपणे साकारते, असे प्रतिपादन सर्वत्र केले जात असले तरी, आकारमान आणि लोकसंख्या लहान असणा-या राज्यांचेही विकासविषयक काही विविक्षित प्रश्न असतात, हे वास्तव नजरेआड करता येत नाही. एक तर, लहान राज्यांच्या आर्थिक साधनसामग्रीचा पाया मर्यादित असतो. त्यांतही पुन्हा, उत्तराखंड अथवा झारखंड यांसारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्याबाबतीत समृद्ध असणा-या राज्यांच्याबाबतीत हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनतो. कारण, जोरदार आर्थिक विकास साध्य करायचा तर उपलब्ध नैसर्गिक संपदेचा तितकाच सघन वापर अनिवार्य ठरतो आणि, नैसर्गिक साधनसामग्रीच्या अशा सघन वापरातून पर्यावरणाच्या -हासाची समस्या दत्त म्हणून उभी ठाकते.

पर्यावरणाच्या -हासाची ही समस्याही प्रत्यक्षात दुपेडी असल्याचे दिसते. एक म्हणजे, वाढती मानवी वस्ती आणि वेगवान आर्थिक विकास यांपायी बहुमोल अशा निसर्गदत्त संपदेचा बेलगाम वापर आणि उपसा केला जातो. त्यांतून उद्‌भवते पर्यावरणाचे असंतुलन आणि प्रदूषण. दुसरे म्हणजे, विकास प्रक्रियेला गती देणा-या पायाभूत सेवासुविधांच्या निर्मितीस चालना मिळाल्याने बदलणा-या भू-वापराद्वारे भूस्तराचा पोत पालटतो आणि त्यांपायी अपघातप्रवणता वाढून पर्यावरणीय असुरक्षितताही वाढू लागते.



उत्तराखंडासारख्या पर्वतीय राज्यात ही समस्या आताशा अधिक ठसठशीतपणे सामोरी येते आहे. भूस्खलन आणि दरडी कोसळणे हे हिमालय पर्वतरांगांमध्ये नित्याचेच वास्तव असले तरी, भूस्तर खचण्याची वारंवारता आणि त्यांपायी होणा-या हानीची व्याप्ती यांत अलीकडील काळात लक्षणीय वाढ होत असल्याचे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. विशेषतः, पावसाळ्यात तर भूस्खलन आणि दरडी कोसळण्याच्या घटना अधिकच घडतात. २०१० सालातील ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात उत्तराखंडातील अनेक भागांत मोठ्या प्रमाणावर भूस्खलन घडून आले. अशा प्रकारच्या घटनांमध्ये गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात तिथे एकंदर २२० व्यक्ती मृत्युमुखी पडल्या. इथे नोंदविण्यासारखी एक लक्षणीय बाब म्हणजे, रस्तेबांधणी नव्याने होत असलेल्या अथवा रस्त्यांच्या रुंदीकरणाची कामे प्रवर्तित केली जात असलेल्या भागांमध्ये भूस्खलनाच्या घटना विशेषत्त्वाने घडत असल्याचे चित्र सामोरे येते आहे. मुळात, हिमालय पर्वतरांगा आणि त्या परिसरातील डोंगरउतार हे पूर्वापारच भूकंपप्रवण आहेत. त्यामुळे, इथला भूस्तर निसर्गतःच अस्थिर आहे. आता, मानवी वस्ती, मानवी वर्दळ आणि बांधकाम व वाहतुकीसारखे मानवी व्यवहार मोठ्या प्रमाणावर वाढीस लागल्याने या अस्थिरतेमध्ये भरच पडतच चाललेली आहे. त्यांपायी, या प्रदेशाची पर्यावरणीय असुरक्षितताही वाढत असल्याचे अनुभवास येते आहे.

पर्यावरणात अलीकडील काळात साकारत असलेले काही बदलही या असुरक्षिततेत भर घालत आहेत. गेल्या वर्षी १८ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर या चारच दिवसांच्या काळात उत्तराखंडात झालेला अफाट पाऊस हे याचे अगदी अलीकडचे उदाहरण. आभाळ फाटल्यागत कोसळलेल्या या पावसात ५३४ घरे जमीनदोस्त झाली तर २ हजार ३१८ घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड घडून आली. या निसर्गकोपात ६५ माणसे तर ८४ जनावरे दगावली. २००० ते २०१० या दहा वर्षांच्या कालावधीत उत्तराखंडात पावसाळ्यादरम्यान जेवढी सरासरी वार्षिक पर्जन्यवृष्टी झाली तिच्यापेक्षा गेल्या वर्षीच्या त्या चार दिवसांत पडलेला पाऊस तब्बल ३३६ टक्के इतका जास्त होता ! वरकरणी हे निखळ अस्मानी संकट दिसत असले तरी तो विशुद्ध निसर्गप्रकोपच होता का, असा प्रश्न अभ्यासकांना अलीकडे सतावतो आहे.

## निसर्गाच्या करणीला जोड मानवी व्यवहारांची

गेल्या वर्षीच्या सप्टेंबर महिन्यातील त्या चार दिवसांत अक्राळविक्राळ बरसलेला तो पाऊस ही नैसर्गिक आपत्ती असली तरी त्या आपत्तीची रौद्रता त्या परिसरातील मानवी व्यवहारांमुळे अधिक वाढली, अशा निष्कर्षाप्रत आता भूस्तर आणि पर्यावरण तज्ज्ञ आता हळूहळू येऊ लागलेले आहेत. किंबहुना, हिमालयाच्या परिसरात जिथेजिथे म्हणून मानवी वस्ती आणि वर्दळ वाढते आहे तिथेतिथे याच वास्तवाची भावंडे दृष्टोत्पत्तीस पडत असल्याचे त्यांचे प्राथमिक निरीक्षण सांगते. गंगा-अलकनंदेच्या खो-यात ह्रषिकेश ते माना या दरम्यान पर्वतमय प्रदेशात बांधण्यात येत असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या पट्ट्यात (राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५८) करण्यात आलेल्या प्राथमिक पाहणी-सर्वेक्षणांचे निष्कर्ष या अनुमानास दुजोरा देणारे आहेत. स्थानिक परिसराची भूवैशिष्ट्ये आणि भूस्तराचा पोत यांची उचित अशी दखल रस्त्यांची बांधकामे करीत असताना किंवा/तसेच पूर्वीच बांधण्यात आलेल्या रस्त्यांचे रुंदीकरण करीत असताना घेण्यात न आल्याने भूस्खलन आणि दरडी कोसळण्याच्या प्रकारांची वारंवारता आताशा वाढते आहे, असे भूस्तर वैज्ञानिकांचे म्हणणे आहे. अकस्मात झालेल्या जोरदार पावसासारख्या निसर्गघटितांपायी होणा-या हानीचे प्रमाण आणि तीव्रता त्यामुळे अधिकच वाढते वा भासते, असे या अभ्यासकांचे मत आहे.

स्वतंत्र उत्तराखंड राज्याची निर्मिती झाल्यानंतर तिथे मोठ्या प्रमाणावर हातात घेण्यात येत असलेल्या रस्तेनिर्मितीच्या उपक्रमांचा या सगळ्या घटनाक्रमाला हातभार लागतो आहे. उत्तराखंडात पूर्वापार विद्यमान असलेले रस्त्यांचे जाळे आता तेथील वाढती मानवी वस्ती आणि वाहतूक यांचा भार सोसण्यास असमर्थ ठरते आहे. धार्मिक-आध्यात्मिक माहात्म्याचे वलय लाभलेल्या स्थळांची उत्तराखंडात रेलचेल आहे. बद्रिनाथ, ऋषिकेश, उत्तरकाशी, गंगोत्री, जोशीमठ, देवप्रयाग, नंदप्रयाग, रुद्रप्रयाग... यांसारखी, लक्षावधी भाविकांचे श्रद्धास्थान असणारी तीर्थक्षेत्रे उत्तराखंडात आहेत. एका अंदाजानुसार, तीर्थयात्रा आणि पर्वकाळांच्या ऐन मोसमात बद्रिनाथ ते ऋषिकेश यांच्यादरम्यानच्या मार्गावर सुमारे दोन ते तीन लाख वाहनांची ये-जा होते. या संख्येत प्रत्यही वाढच होताना दिसते.



खासगी तसेच व्यापारी, प्रवासी तसेच मालवाहतूक अशा सर्वच प्रकारच्या वाहतुकीमध्ये स्वतंत्र उत्तराखंड राज्याच्या निर्मितीनंतर प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. आजही ही प्रक्रिया चालूच आहे. त्यातच, हिमालयातील विविध नद्यांच्या खो-यात लहान-मोठ्या आकाराचे असंख्य जलविद्युतनिर्मिती प्रकल्प प्रवर्तित करण्यात आलेले आहेत. या प्रकल्पांसाठी आवश्यक असणा-या अवजड यंत्रसामग्रीची वाहतूक, त्यामुळे, या भागात सर्वत्र वाढलेली दिसते. ही अवजड यंत्रे वाहून न्यावयाची तर दळणवळणाचे रस्ते रुंद हवेत. उत्तराखंडच्या डोंगराळ भागांतील रस्ते स्वरूपतःच अरुंद. कारण, सपाटीवरची जमीनच मुदलात कमी. अवजड यंत्रे वाहून नेणारी वाहनेही मोठी. ही वाहने फिरवायची तर त्यांना रस्ते चांगले लांबरुंदच हवेत. त्यासाठीच रस्तेरुंदीकरणाला या भागात गती देण्यात आलेली आहे. विद्यमान रस्त्यांच्या रुंदीकरणामुळे या परिसरातील डोंगरउतारांच्या नैसर्गिक कोनात बदल घडून येत आहेत. त्यांमुळे एकंदरच प्रस्तररचनेची अंतर्गत फेररचना होऊन या प्रदेशाची सर्वसाधारण भूस्खलनप्रवणता वाढते आहे, असा भूस्तर वैज्ञानिकांचा दावा आहे.

पायाभूत सेवासुविधांच्या या अशा निर्मितीद्वारे निवासी बांधकामांनाही चालना मिळते आहे. उत्तराखंडच्या गढवाल प्रांतातील श्रीनगर, देवप्रयाग, रुद्रप्रयाग, कर्णप्रयाग, नंदप्रयाग... यांसारख्या ठिकाणांच्या परिसरात नवीन निवासी बांधकामांचे अलीकडील काळात जणू पेवच फुटलेले आहे. मुळात उत्तराखंडाचा हा प्रदेश पर्वतमय. ही सगळी नागरी केंद्रेही डोंगरउतारांवरच वसलेली. निवासी बांधकाम करण्यायोग्य असे कठीण, भक्कम भूस्तर इथे तुलनेने कमीच आहेत. अशी जी काही बांधकामयोग्य ठिकाणे इथे होती अथवा आहेत ती पूर्वीच वापराखाली आलेली. निवासी बांधकामे आणि त्यासाठी बांधकामयोग्य जागेला असणारी मागणी एकीकडे वाढतेच आहे. साहजिकच, बांधकामांच्या दृष्टीने एरवी अयोग्य ठरले असते असे डोंगरउतारही आता घरे-दुकाने-मंदिरे बांधण्यासाठी वापरले जात आहेत. ठिसूळ भूस्तरांचे उतार बांधकामयोग्य बनविण्यासाठी अशा उतारांची बांधबंदिस्तीही हाती घेतली जाते आहे. त्यामुळे पुन्हा, अस्थिर भूस्तरांच्या भूस्खलनप्रवणतेमध्ये भरच पडताना दिसते. ***(कृपया पृष्ठ ३३ पाहावे)***

सामाजिक

# अस्तर संघर्षाचे, अस्थिरतेचे आणि भयाचेही...

एकीकडे सुबत्ता आणि दुसरीकडे संघर्ष, असे जगातील आजच्या बोच-या विरोधाभासाचे स्वरूप आहे. आर्थिक प्रगतीची प्रक्रिया जगभरातील वेगवेगळ्या देशांत निरनिराळ्या प्रकारे आणि कमी-अधिक प्रमाणात पुढे सरकताना दिसते. या समृद्धीच्या हातात हात घालूनच देशोदेशी शांती आणि स्थैर्याचाही माहौल प्रवेशेल, ही अपेक्षा मात्र अनेक ठिकाणी फलद्रुप होताना दिसत नाही. किंबहुना, वास्तवातील चित्र विपरितच आहे. प्रगतीला अस्तर दिसते संघर्षाचे. हे अस्तरही पुन्हा चांगले तिहेरी आहे. संघर्ष, त्या संघर्षातून निपजणारे अस्थैर्य आणि या अस्थैर्याच्या भावनेपोटी पसरणारी भयाची भावना असे हे तीन पदर. परंतु, इथे मुद्दाम नोंदविण्यासारखी एक बाब अशी की, या सगळ्याच्या मुळाशी असणारा संघर्ष आणि त्यांतून प्रसवणारा हिंसाचार यांचे २१व्या शतकाच्या या पहिल्या दशकात सामोरे आलेले स्वरूप हे संघर्ष, दहशत आणि हिंसेच्या २०व्या शतकातील रूप-स्वरूपापेक्षा गुणात्मकरीत्या अतिशयच निराळे आहे. त्यांमुळे, अशा सगळ्या अनिष्ट आणि मानवी जीवनाचा पोत बिघडविणा-या बाबींचा सामना करण्याबाबतची आजवरची प्रमाणित कार्यप्रणालीही आताशा अप्रस्तुत ठरू लागलेली दिसते.

राष्ट्राराष्ट्रांमधील युद्धे, प्रासंगिक लढाया, सीमांच्या आखणी अथवा फेररचनांवरून उद्भवणारे सशस्त्र संघर्ष, वांशिक दंगली, साम्राज्यशाही विरोधातील उठाव व लढे, अशा लढ्यांदरम्यान होणारा रक्तपात, देशांतर्गत उसळणारी यादवी...ही २०व्या शतकातील संघर्षाची मुख्य कारणे राहिलेली आहेत. या स्वरूपाच्या संघर्षाची हाताळणी आणि सामना करण्याबाबतची कार्यप्रणालीही गेल्या शतकात त्यामुळे ब-यापैकी प्रमाणित झालेली होती. असे संघर्ष उद्भवू नयेत यासाठी शिष्टाई अथवा वाटाघाटी, संघर्षादरम्यानचा प्रतिबंधात्मक हस्तक्षेप आणि संघर्षोत्तर काळातील पुनर्वसन यांबाबतची उपाययोजनात्मक अनुभवजन्य चौकट चांगल्यापैकी सिद्ध बनलेली होती.



अशा प्रकारच्या संघर्ष आणि हिंसाचारांमध्ये सहभागी होणारे गट-समूह, त्यांची उद्दिष्टे, कार्यपद्धती, विचारप्रक्रिया हे ब-यापैकी सुस्पष्ट आणि प्रगट असल्याने अशा घटना-प्रवृत्तींचा बीमोड-बंदोबस्त करण्यासंदर्भात शासनसंस्थेची भूमिका व जबाबदारीबाबतही गेल्या शतकात सर्वच स्तरांवर खूपच स्पष्टता असे. परंतु, आजच्या जगातील संघर्ष, त्यांमागील कारणे, त्यांतून उसळणारा हिंसाचार यांचे स्वरूप मात्र पूर्णतः वेगळेच आहे. त्यामुळे, 'काल'ची उपाययोजना 'आज'च्या काळात तितकीशी प्रभावशाली तर सोडाच परंतु प्रस्तुतही ठरत नसल्याचा अनुभव येतो आहे. राष्ट्राराष्ट्रांमधील संघर्ष, देशांतर्गत यादवी युद्धे जगाच्या काही भागांत आजही झडतातच आहेत. परंतु, अशा प्रकारांमधून उद्भवणा-या हिंसाचारांचे बळी ठरलेल्यांच्या प्रमाणात अलीकडील पाव शतकात लक्षणीय घट घडून आलेली आहे. पण म्हणजे, जगात सगळे काही आणि सगळीकडे सारे कसे आलबेल आहे, असाही निष्कर्ष यांवरून काढता येत नाही. कारण, हिंसा, क्रौर्य, हत्या, रक्तपात, संघटित गुन्हेगारी... यांच्या घनदाट पटलाखाली जगाच्या वेगवेगळ्या भागांतील जवळपास १५० कोटी लोक आपले जीवन आज कंठत आहेत. पण गंमत म्हणजे, या संघर्ष व हिंसाचाराचे स्वरूप आणि त्यांमागील कारणे इतकी बहुआयामी आणि म्हणूनच गुंतागुंतीची आहेत की, 'युद्ध' अथवा 'गुन्हेगारी हिंसा' किंवा 'राजकीय हिंसा' अशा साचेबंद वर्गवारीमध्ये ती बसवता येत नाहीत.

या वास्तवाचा आज जाणवणारा सर्वाधिक भयकारी परिणाम म्हणजे, संघर्ष, हिंसाचार, अस्थैर्य, त्यांपायी विसविशीत होणारी सुशासनाची घडी, शासनघडी सैलावल्याने कमकुवत होणारी व्यवस्थात्मक यंत्रणा आणि कमजोर यंत्रणा-व्यवस्थांपायी काबूत न येऊ शकणारा हिंसाचार... अशा दुष्टचक्राच्या आवर्तनांचा सामना जगातील अनेक देशांना आताशा वारंवार करावा लागतो आहे. यांहूनही भयावह बाब म्हणजे, असे संघर्ष आणि त्यांतून निपजणारा हिंसाचार ही जणू एक परंपराच बनू पाहते आहे. ज्या देशांत गेली सुमारे तीन दशके यादवी नांदली अशाच देशांमध्ये गेल्या दशकातील एकूण यादवी संघर्षापैकी ९० टक्के संघर्ष एकवटलेले होते. आता तर, संघर्ष आणि हिंसाचाराची नवनवीन रूपे सामोरी येत आहेत !

संघर्षजन्य हिंसाचाराचे उगमस्त्रोत पुन्हा परस्परांत गुंफलेले आहेत. प्रदीर्घ अशा राजकीय स्वरूपाच्या संघर्षाची पार्श्वभूमी असलेले एल् साल्वादोर, ग्वाटेमाला आणि दक्षिण आफ्रिकेसारखे देश आज गुन्हेगारी स्वरू पाच्या हिंसाचाराचा मुकाबला करताना दिसतात. गुन्हेगारी घटकांकडून राजकीय चळवळींना आर्थिक पाठबळ मिळत असल्याचे दाखले कांगो आणि उत्तर आयर्लंडमध्ये मिळत आहेत. तर, निवडणुकांदरम्यानच्या हिंसाचारास गुन्हेगारांच्या संघटित टोळ्यांकडून इंधनपुरवठा होत असल्याचे वास्तव जमैका आणि केनियासारख्या देशांमध्ये सामोरे येते आहे. इस्लामी मूलतत्त्ववादासारख्या जागतिक स्तरावरील विचारप्रवाहाच्या पाठिराख्यांनी स्थानिक स्तरावरील असंतोषाच्या तव्यावर विद्वेषाची पोळी भाजून घेण्याची अनेक उदाहरणे पाकिस्तान आणि अफगाणिस्तानात आपण बघतो आहोत. याचा परिणाम असा होतो आहे की, संघर्ष आणि हिंसाचाराचा हा दैत्य एकमुखी नसून बहुमुखी असल्याने त्याच्या विरु द्धची लढाई एकाच वेळी एकापेक्षा अधिक आघाड्यांवर उघडणे अनिवार्य ठरते आहे. हिंसाचारग्रस्त देशांतील सरकारांसमोर आजचे मोठे जटिल आव्हान हेच होय.

संघर्ष, हिंसाचार, रक्तपात, असुरक्षितता, अस्थैर्य, हिंसाचार आणि वांशिक अत्याचारांपायी होणारे विस्थापन, विस्थापितांचे पुनर्वसन... यां सगळ्या घटनाचक्राची प्रचंड किंमत हिंसाचारग्रस्त देशांना मोजावी लागते आहे. दंगलधोप्यांदरम्यान होणारे मालमत्तेचे नुकसान हा झाला त्यांतील केवळ एक भाग. परंतु, सर्वव्यापी अशा सामाजिक अशांततेच्या कुंडात आहुती पडते ती आर्थिक विकासाची. त्यांतून 'गरिबी-बेरोजगारी-सामाजिक असंतोष-कुंठित विकास-गरिबी' हे दुष्टचक्र सातत्यशील आणि स्वयंप्रेरक बनते. टांझानियासारख्या देशाला त्याच्या ठोकळ देशी उत्पादनाचा एक टक्का दरवर्षी हिंसाचाराच्या मुकाबल्याखातरच खर्ची घालावा लागतो ! स्थानिक पातळीवरचे राजकीय, सामाजिक अथवा वांशिक तंटे, संघटित गुन्हेगारी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील वाद यांची साखळी विणली गेलेली असल्याने आज कोणीच या आक्रांतापासून मुक्त नाही. यामुळे झाले आहे असे की, संघर्ष आणि त्यातून निपजणा-या हिंसाचाराचे आव्हान जगातील विकसित तसेच विकसनशील देशांसमोर समसमानपणे उभे ठाकते आहे.



सर्वसाधारण विकासाच्या प्रक्रियेशी संघर्ष आणि त्याद्वारे निपजणारा हिंसाचार या दोहोंच्या असणा-या घनिष्ठ नात्याचे दर्शन आपल्याला, संघर्षाच्या सावटाखालून बाहेर येत असलेल्या अथवा आलेल्या देशांनी विकासपथावर केलेल्या वाटचालीद्वारेही घडते. राजकीय तसेच गुन्हेगारी स्वरू पाच्या हिंसाचाराचा वारसा असणा-या देशांत अलीकडील काळात शांतीचा माहौल अवतरल्याने ते देश प्रगतीच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत असल्याचे जगात काही ठिकाणी दिसणारे आश्वासक चित्र मनाची उभारी वाढविणारे असेच आहे. पिण्यायोग्य पाण्याच्या सुविधेचा लाभ पदरात पडलेल्या नागरिकांच्या प्रमाणात १९९० ते २०१० या २० वर्षांच्या कालावधीदरम्यान इथिओपियामध्ये १३ टक्क्यांवरू न ते थेट ६६ टक्क्यांपर्यंत वाढ घडून आली. तर, १९९७ ते २००५ या आठ वर्षांच्या काळात, कुपोषितांच्या प्रमाणात ५६ टक्क्यांवरू न ४० टक्क्यांपर्यंत घट घडवून आणण्यात र्‍वांडाला यश आलेले दिसते. दुसरीकडे, प्राथमिक शिक्षणाचा टप्पा यशस्वीपणे पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांच्या प्रमाणात १९९९ ते २००७ या अवघ्या आठ वर्षांदरम्यान १४ टक्क्यांवरू न ४६ टक्क्यांपर्यंत वाढ साध्य करणे मोझांबिकला शक्य बनले. बालआरोग्याच्या क्षेत्रात बोस्निया आणि हर्झगोव्हिना या दोन देशांनी साधलेली प्रगतीही अशीच लक्षवेधक ठरते. वय वर्षे १२ महिने ते २३ महिने या वयोगटातील मुलामुलींना गोवरप्रतिबंधक लस टोचण्याचा उपक्रम या दोन देशांनी १९९५ ते २००७ या १२ वर्षांदरम्यान हिरिरीने राबविला. या देशांनी हाती घेतलेल्या लशीकरण मोहिमेचा लाभ मिळणा-या बालकांच्या प्रमाणात या कालावधीदरम्यान ५३ टक्क्यांवरू न ९६ टक्क्यांपर्यंत वाढ घडून आली.

आर्थिक-सामाजिक विकास आणि कायदा व सुव्यवस्था यांचा असलेला निकट संबंध ध्यानी घेऊ न, उत्तरोत्तर व्यामिश्र बनत असलेल्या या संघर्ष आणि हिंसाचारग्रस्त वास्तवाला सामोरे जाण्याची जागतिक समुदायाची क्षमता उंचावण्यासाठी वैश्विक पातळीवरच एकात्म प्रयत्न होण्याची आवश्यकता या सगळ्यातून अधोरेखित होते. या संदर्भात सगळ्यांत मोठे आव्हान आहे ते देशोदेशीच्या संस्थात्मक आणि व्यवस्थात्मक चौकटींचे सक्षमीकरण घडवून आणण्याचे. ■■

पुरातत्व

# शोध अपरिचित इजिप्तचा

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने अवकाशात विहार करू शकणा-या मानवाचे पुरातनाचा शोध घेण्याचे कुतूहल शमलेले नाही. किंबहुना, आकाशात फिरतानाही त्याचे मन आपल्या भूमीकडेच असावे. पुरातनाचा शोध घेताना, भूगर्भात लुप्त झालेल्या इतिहासातील पाऊलखुणा शोधण्याचा प्रयत्न आता अवकाशमार्गे होऊ लागला आहे. त्यामुळे 'स्पेस आर्किऑलॉजी' असा विषय महत्त्वाचा ठरू लागला आहे. पिरॅमिड्स्साठी प्रसिद्ध असलेल्या इजिप्तचा इतिहास धुंडाळण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात येत आहे. या अभ्यासातून असे आढळले आहे की, आजपर्यंत अज्ञात असलेले किमान १७ पिरॅमिड्स्, सुमारे एक हजार घुमट आणि कोणे एके काळी मानवी वस्ती असू शकेल, अशी सुमारे तीन हजार ठिकाणे इजिप्तमध्ये आहेत. अर्थात, प्रत्यक्ष उत्खननातून हे सगळे सिद्ध होण्यासाठी बराच काळ लागणार आहे. पण त्या दिशेने संशोधकांची पुढील पावले पडत आहेत.

'स्पेस आर्किऑलॉजी'ला 'रिमोट सेन्सिंग टेक्नॉलॉजी' असेही म्हटले जाते. सोप्या शब्दांत मांडायचे झाले तर, उपग्रहामार्फत व इलेक्ट्रोमॅग्नेटिक स्पेक्ट्रम्च्या मदतीने विशिष्ट भूभागाचा सखोल अभ्यास करणारे चित्र (satellite imagery) तयार करणे म्हणजे 'रिमोट सेन्सिंग टेक्नॉलॉजी' होय. हे तंत्रज्ञान गेल्या काही वर्षांपासून उपलब्ध झाले होते तरी पुरातत्वसंशोधकांनी त्याचा वापर करण्याची ही घटना मात्र अलीकडची आहे. त्यातही, इजिप्तबाबत असा अभ्यास करणे ही महत्त्वाची बाब ठरली आहे. कारण, संस्कृतींच्या इतिहासात इजिप्तने वेगळे स्थान मिळविले आहे. नाईलच्या खो-यातील संस्कृतीचा परिचय घडविणारे व खिस्तपूर्व तीन हजार वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले पिरॅमिड्स् हे पुरातत्वसंशोधकांसाठी तसेच संस्कृतींच्या अभ्यासकांसाठी औत्सुक्याचा विषय ठरले आहेत.



पिरॅमिड्स्बाबत आजपर्यंत अनेक प्रकारे संशोधन झाले आहे. त्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना आणि त्यामागे असलेला राजघराण्यांचा इतिहास यांमुळे पिरॅमिड्स् नेहमीच कुतुहलाचे ठरले. पण इजिप्तची प्राचीन संस्कृती म्हणजे केवळ राजघराणी व पिरॅमिड्स् एवढेच नव्हे, असे 'स्पेस आर्किऑलॉजी'चा उपयोग करणा-या संशोधकांचे मत आहे. अलाबामा विद्यापीठातील पुरातत्वसंशोधक डॉ. Sarah Parcak गेल्या दहा-बारा वर्षांपासून 'स्पेस आर्किऑलॉजी'च्या मदतीने इजिप्तचा अभ्यास करीत आहेत. इजिप्तचे भौगोलिक स्थान आणि हवामानविषयक स्थिती लक्षात घेऊन अशा उपग्रहचित्रांचा अभ्यास करणे हे गुंतागुंतीचे ठरते, कारण अशा चित्रांचे विश्लेषण हजारो प्रकारे करणे शक्य असते. डॉ. Parcak यांच्या विश्लेषणानुसार इजिप्तमधील वाळवंटात पिरॅमिडशिवाय अजूनही खूप गुपिते दडलेली आहेत. इजिप्तच्या इतिहासातील फक्त एक टक्का भाग आजपर्यंतच्या अभ्यासातून पुढे आला आहे, असे त्यांना वाटते.

### *अशी यंत्रणा 'स्पेस आर्किऑलॉजी'ची*

*पुरातत्वविषयक संशोधन कशा प्रकारचे करायचे आहे, हा विचार 'स्पेस आर्किऑलॉजी'चा उपयोग करताना सर्वप्रथम करावा लागतो. अभ्यास-संशोधन व सर्वेक्षण मोठ्या प्रमाणावर करायचे असेल तर multi-spectral imageryचा उपयोग केला जातो. विशिष्ट भूभागाचेच चित्र हवे असेल तर high-resolution imageryचा उपयोग केला जातो. अशा प्रकारे माहिती मिळविल्यानंतर geographic information system (GIS) वापरून विविध प्रकारच्या माहितीबरोबर त्या माहितीची सांगड घातली जाते. इजिप्तमधील अभ्यासाच्या संदर्भात इलेक्ट्रोमॅग्नेटिक स्पेक्ट्रम्चे भाग महत्त्वाचे ठरतात. इन्फ्रारेडमुळे मातीबाबतची अधिक माहिती तर imagery वर्गीकरणामुळे भूभाग समजून घेण्यास मदत होते. भूभागात बदल झाले किंवा कसे हे समजून घेणे इथे उपयुक्त ठरते. या सर्व माहितीचा परस्परांशी असलेला संबंध लक्षात घेऊन व त्याचे योग्य विश्लेषण करून त्या आधारे प्रत्यक्ष जागेवर पाहणी करणे व उत्खनन करणे हे शेवटच्या टप्प्यात अपेक्षित असते.*

'स्पेस आर्किऑलॉजी'द्वारे पुढे आलेल्या माहितीनुसार उत्खनन केले तर ते काम किमान दोन-तीन पिढ्यांसाठी पुरावे इतके असल्याचे मत डॉ. Parcak यांनी मांडले आहे. गेल्या दीड-दोनशे वर्षांपासून इजिप्तमध्ये संशोधन चालू असले तरी पिरॅमिड्स्शी संबंधित असलेली माहितीच प्रामुख्याने उपलब्ध झाली. पण, प्राचीन काळातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित तपशील या संशोधनातून अद्याप उलगडायचाच आहे. तो कदाचित आता पुढील संशोधनाद्वारे स्पष्ट होईल, असे तज्ज्ञांना वाटते. 'स्पेस आर्किऑलॉजी'द्वारे पुढे आलेल्या चित्रानुसार फार जुन्या काळी राजधानीची जागा असलेल्या Itjtawi येथे पाहणी करण्यात आली. त्या वेळी चित्रानुसार असे दिसून आले की त्या भागात काही भौगोलिक बदल झाले असावेत. जुन्या काळी अस्तित्वात असलेल्या आणि आज मागमूस नसलेल्या शहरांचे भौगोलिक स्थान नेमकेपणाने निश्चित करण्यासाठी अशा चित्रांचा उपयोग होऊ शकतो. निओलिथिक काळातील झोपड्या कुठे आढळण्याची शक्यता आहे ते या चित्रांवरून समजून येऊ शकते. असे असले तरी उपलब्ध झालेल्या चित्रांवरून सर्वच बाबी स्पष्ट होतीलच असेही नाही. एका ठिकाणी पिरॅमिड असण्याची शक्यता असल्याचे चित्रावरून आढळले होते. प्रत्यक्ष त्या जागेची पाहणी केली असता तेथील मातीवरून वा भौगोलिक परिस्थितीवरून तेथे पिरॅमिड असेल किंवा कसे याबाबत नेमके काहीच समजून आले नाही.

एका चित्रानुसार इजिप्तमध्ये प्राचीन काळी एक दाट लोकवस्तीचे शहर होते असे दिसून आले. प्राचीन काळी घरे बांधण्यासाठी तिथे मातीच्या विटा वापरल्या जात होत्या. या विटांची रचना वैशिष्ट्यपूर्ण असल्याने घरांची रचना कशी असेल, ते या चित्रांद्वारे दिसून आले. त्यावरून घरांच्या बाह्य आराखड्याबाबत अंदाज मांडणे संशोधकांना शक्य झाले. प्राचीन काळी असलेल्या Tanis शहराच्या जागी आता San El Hagar हे शहर आहे. नाईलच्या दक्षिणेकडील भागांतील Gurob येथे संशोधकांनी पाहणी केली तेव्हा दूरवर पसरलेले वाळवंटच तेथे होते. मात्र, चित्रानुसार तेथे एके काळी राजघराण्यातील स्त्रियांसाठी बांधण्यात आलेला महाल होता, असे सूचित होत होते. मात्र, महाल असल्याच्या



खाणाखुणा तेथे आढळल्या नाहीत. उत्खनन केले तर कदाचित यावर प्रकाश पडू शकेल. प्राचीन काळातील महालांबाबतची अशी माहिती आजघडीला उपलब्ध नाही. मात्र, इजिप्शियन चित्रकलेतील एक उत्कृष्ट नमुना असलेल्या आणि एका लाकडावर कोरलेल्या चित्रात राणी व तिचा महाल रेखाटण्यात आला आहे. या महालाची बाह्य रचना कशी होती याचा प्राथमिक अंदाज डॉ. Sarah Parcak यांच्या चित्रांवरून येतो. अभिजनांचे महाल आणि सामान्य नागरिकांची छोटी घरे, झोपड्या इत्यादींचे चित्र इजिप्तमधील नागरी जीवनावर प्रकाश टाकण्यास पुरेसे नाही. त्या काळातील सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन कसे होते, हे समजून घेण्यासाठी उत्खननाची आवश्यकता आहेच. प्राचीन काळी प्रगतीची वाट चाललेल्या आणि संस्कृतींच्या इतिहासात मैलाचा दगड ठरलेल्या या संस्कृतीच्या विकासाचे टप्पे कोणकोणते असतील, याचा अंदाज बांधण्यासाठी अशा प्रकारचे अनेक अभ्यास करावे लागणार आहेत. ■■


## दुसरी आवृत्ती प्रकाशित

***आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ***

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रुपये**

सामाजिक

# ब्रिटनमधील उद्रेक नेमका कशामुळे ...?

कोणत्याही प्रकारच्या सामाजिक उद्रेकाला एक तात्कालिक कारण असते, हा अनुभव बहुतेकदा येतो. हातापायाला झालेले गळू अवचितच फुटावे, तशातला हा प्रकार असतो. एखादी काही तरी घटना घडते आणि समाजपुरुषाच्या मनात कोंडून राहिलेल्या शोक-संताप-खदखदीला एकदम विस्फोटक वाट मिळते. ब्रिटनमध्ये नेमके हेच आणि असेच घडले. ४ ऑगस्ट २०११ रोजी मार्क डगन नावाचा एक कृष्णवर्णीय तरूण ब्रिटिश पोलिसांच्या गोळीला बळी पडला आणि ब्रिटनमध्ये हिंसाचाराचा डोंब उसळला. राजधानी लंडनमध्ये उडालेला हा भडका यथावकाश ब्रिटनमधील शहरोशहरी पसरला आणि पुढील जवळपास आठवडाभर दंगल, लुटालूट, जाळपोळ, हिंसाचार यांचे सत्र चालूच राहिले. लोकशाहीचे पाठ उभ्या जगाला पढवणा-या ब्रिटनमध्येच लोकक्षोभाने इतके विध्वंसक रूप धारण करावे, हा सगळ्या जगाच्याच लेखी विस्मयाचा विषय ठरला. खुद्द ब्रिटनमधील विचारवंत आणि समाजाभ्यासकही या घटनाक्रमाने चक्रावून गेलेले दिसतात. पोलिसी बळाचा बळी झालेला तरूण कृष्णवर्णीय असल्याने कृष्णवर्णीय नागरिकांची वस्ती अधिक असलेल्या भागांत या दंगलींची तीव्रता तुलनेने अधिक दिसली तरी दंगलीतील लोकसहभाग तसा सर्ववर्णीय होता. मुख्य म्हणजे, चांगल्या सुशिक्षित, उच्चविद्याविभूषित, सुखवस्तू, पांढरपेशा, मध्यमवर्गीय समाजस्तरांमधील तरूणही हुल्लडबाजी, लुटालूट आणि नासधूस करीत रस्त्यावर उतरल्याने सगळ्यांनाच अचंबा वाटला.

ब्रिटनमधील अलीकडची दंगल ही म्हणूनच व्यापक सामाजिक चिंतनाचा विषय बनते आहे, बनली आहे. संवेदनशील असे ब्रिटिश समाजाभ्यासक, अर्थवेत्ते, शिक्षणतज्ज्ञ, प्राध्यापक, मानसशास्त्रज्ञ... असे समाजाच्या बुद्धिजीवी समजल्या जाणा-या गटातील लोक या उद्रेकामागील बहुविध कारणपरंपरेचा आणि तिच्यातील व्यामिश्रतेचा वेध घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. हा सारा विचारविमर्श म्हणूनच सर्वांनाच उद्बोधक ठरतो.



ब्रिटिश पोलिसांच्या हातून एका कृष्णवर्णीय तरूणाचा प्राणघात होऊन त्यातून ही दंगळ उसळल्याने या सगळ्याच आकांताला वर्णविद्वेषाची किनार जोडली जाणे स्वाभाविकच असले तरी इतक्या सरळसोट पद्धतीने या घटनाशृंखलेकडे बघता येणार नाही, असे ब्रिटनमधील चिंतनशील समाजाभ्यासकांचे प्रतिपादन आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे ब्रिटिश अर्थव्यवस्थेवर जाणवणारे भलेबुरे परिणाम, त्यांतून निपजणारी वर्गीय रचना, त्या रचनेत केवळ वंचितता आणि अभावग्रस्तताच वाट्याला आलेल्या समाजघटकांमधील वर्गीय असंतोष, जागतिक पातळीवर २००८ सालात उद्‌भवलेल्या वित्तीय संकटानंतर ब्रिटिश अर्थव्यवस्थेसमोर उभी ठाकलेली आव्हाने, अलीकडील काही वर्षांत शासनसंस्थेच्या हुकुमतीला सर्वच स्तरांवर एकंदरीनेच येत असलेली उतरती कळा, ब्रिटिश तरुणाईच्या वाढत्या अपेक्षा, त्या अपेक्षांची दखल घेण्याबाबत राजकीय व्यवस्थेकडून व्यक्त होणारी असमर्थता वा असंवेदनशीलता, ब्रिटिश पोलीसदलाची मानसिकता, ब्रिटनमध्ये विद्यमान असणारी सामाजिक सुरक्षेची व्यवस्था, वेगवेगळ्या सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक स्तरांतील नागरिकांना निरनिराळ्या कारणांपायी वेढून असणारी प्रगाढ असुरक्षिततेची भावना आणि सर्वांत मुख्य म्हणजे विसविशीत बनत असलेली व कमालीच्या अवनत अवस्थेला प्राप्त झालेली ब्रिटिश कुटुंबव्यवस्था अशा अनेकानेक कारणांचे घट्ट विणले गेलेले एक दुर्धर जाळेच ब्रिटनमधील ताज्या उद्रेकाच्या मुळाशी आहे, असा एक बळकट सूर तेथील चर्चा-मंथनातून निष्पन्न होताना दिसतो.

दंगलीदरम्यान रस्त्यावर धुडगुस घालणा-यांत तरूण विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षणीय होते. उच्च शिक्षणासाठीच्या शैक्षणिक शुल्कात वाढ घडवून आणण्याबाबत ब्रिटनमध्ये चालू असलेल्या हालचाली, त्या संदर्भात विचाराधीन असणारे वा लागू करण्यात आलेले प्रस्ताव, ब्रिटिश तरुणांमध्ये फैलावणारी बेरोजगारी, भग्नावस्थेस जात असलेली ब्रिटिश कुटुंबप्रणाली, ब्रिटनमध्ये अस्तित्त्वात असणा-या सामाजिक सुरक्षा व्यवस्थेच्या कवचाद्वारे कुटुंबव्यवस्थेच्या विघटनाला एक प्रकारे लाभणारा आश्वासक आधार... अशी शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक-कौटुंबिक कारणे या वास्तवामागे असल्याचे तेथील तज्ज्ञांचे अनुमान आहे.

उच्च शिक्षणासाठीचे शैक्षणिक शुल्क वाढविण्यात आल्याने, उच्च शिक्षणाला आर्थिक सुबत्तेचा राजमार्ग मानणा-या समाजघटकांमध्ये अलीकडील दोन वर्षांत प्रचंड अस्वस्थता अनुभवास येत होतीच. उच्च शिक्षणाच्या शुल्कवाढीस ब्रिटिश मध्यमवर्गीयांनी या आधीच रस्त्यावर उतरून हिंसक विरोध दर्शविलेला होता. या वेळच्या हिंसक घटनांमध्ये ब्रिटिश समाजाच्या आर्थिकदृष्ट्या निम्न स्तरांतील महाविद्यालयीन मुले मोठ्या प्रमाणावर सामील झालेली दिसण्यामागे हेच कारण असल्याचे विश्लेषण आता तिथे केले जाते आहे. उच्च शिक्षण ही भौतिक प्रगतीची एक वाट मानली जाते. मुळात, ब्रिटिश अर्थव्यवस्थेतील औद्योगिक क्षेत्र आपले चैतन्य गमावून बसलेले असल्याने औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराच्या माध्यमातून भौतिक उन्नती साधण्याचा हुकुमी मार्ग आकुंचन पावलेला आहे. ब्रिटिश रोजगाराची ही अशी संरचना हाच अनेक अभ्यासकांच्या मते आजघडीचा खरा चिंतेचा विषय होय. आता उच्च शिक्षणही महाग होऊ लागलेले आहे. सरकारी उद्योगांमधील रोजगारनिर्मितीही रोडावलेली आहे. अशा परिस्थितीत, भौतिक उन्नतीची हमी देणारी, भवितव्य घडविण्यास वाव देणारी क्षेत्रे म्हणून करमणूक, क्रीडा अथवा संघटित गुन्हेगारी या तीन क्षेत्रांकडे बघण्याचा कल ब्रिटिश निम्नस्तरीय तरुणाईमध्ये वाढतो आहे. खासगी क्षेत्रातील रोजगारनिर्मितीसंदर्भात 'क्लब्ज्' आणि 'पब्ज्' हीच दोन मोठी क्षेत्रे असल्याचे ब्रिटनमध्ये सरसहा म्हटले जाते. अभ्यासकांच्या मते लंडनमधील काही विभाग तर असे आहेत की, 'क्लब्ज्' हाच त्यांचा आर्थिक कणा आहे !

समाजाभ्यासकांच्या विश्लेषणानुसार, अशा 'क्लब्ज्'मधून उपभोगाची प्रवृत्ती ब्रिटिश तरुणाईमध्ये रुजत जाते. दुसरीकडे, भौतिक अभ्युदयाची आकांक्षा या तरूणांच्या मनात चेतते आहेच. या अपेक्षांची पूर्तता करण्याचे वैध मार्ग प्रशस्त बनविणारा हमीदायक रोजगार मिळणे दुरापास्त बनत चाललेले आहे. जागतिकीकरणाद्वारे जगभरच्या बाजारपेठा परस्परांत गुंफल्या गेल्या आहेत. तंत्रशास्त्रीय प्रगतीमुळे उत्पादन प्रक्रियेचे विकेंद्रीकरण सुलभ बनल्याने मायभूमीतून रोजगारांचे स्थलांतर होते आहे. त्याच वेळी, बाहेरील देशांमधून आलेले स्थलांतरित केवळ अंगमेहनतीचीच कामे नव्हे तर पांढरपेशे रोजगारही 'पळवत' आहेत, अशी या तरुणाईची भावना होते आहे.



अशा कोंडीत चहूंकडून सापडत असलेल्या ब्रिटिश तरुणाईला आश्वस्त बनवू शकेल इतकी प्रगल्भता दाखविण्यात तेथील राजकीय नेतृत्त्व थिटे पडते आहे. या सगळ्या बदलत्या वास्तवाची व्यामिश्रता नीट समजावून सांगेल अशी एकही व्यवस्थात्मक यंत्रणा कार्यरत नसल्याने महाविद्यालयीन युवकवर्गात एकंदरच राजकीय प्रणाली आणी व्यवस्था यांबाबत एक प्रकारची चीड आणि हतबलता नांदते आहे, असे ब्रिटनमधील अभ्यासक म्हणतात. ही सगळी घुसमटच रस्त्यावरील बेफाम लुटालुटीद्वारे, नासधुसीद्वारे विस्फोटकपणे बाहेर पडली असावी, असा या निरीक्षकांचा अदमास आहे. वित्तीय संकटापायी युरोपातील अनेक अर्थव्यवस्थांप्रमाणेच ब्रिटिश अर्थव्यवस्थाही अडचणींचा सामना करते आहे. साहजिकच, सार्वजनिक कल्याणाबाबतच्या योजनांवर धडाक्याने खर्च करण्याबाबत सरकारला हात आखडता घेणे भाग पडते आहे. त्यामुळे, शासनसंस्थेच्या हुकुमतीबाबतही एक प्रकारचा अनादर तरूण वर्गामध्ये सर्वदूर नांदताना दिसतो. सार्वजनिक मालमत्तेची नासधूस, पोलिसांवर हल्ले... यांसारख्या घटनांमधून 'अथॉरिटी'बद्दलचा तरुणाईच्या मनातील तो अनादर ब्रिटनमधील रस्तोरस्ती व्यक्त झाला असावा, असा काही विश्लेषकांचा होरा आहे.

मुलांवर सारासार विचाराचे संस्कार घडविणारी पायाभूत व्यवस्था म्हणून ज्या कुटुंबव्यवस्थेकडे बघितले जाते त्या कुटुंबव्यवस्थेचे झालेले आणि आजही होत असलेले विघटन हे ब्रिटनमधील ताज्या हलकल्लोळाचे गाभा कारण होय, यांवर ब्रिटनमधील सर्वक्षेत्रीय अभ्यासकांचे घाऊक एकमत दिसते. ढासळलेली विवाहसंस्था, घटस्फोटांचे अतिशय मोठे प्रमाण, आई आणि वडील असे दोन्ही पालक नसलेल्या कुटुंबांचीच मोठी टक्केवारी, एक पालक - आणि तीही बहुधा आईच - कुटुंबप्रमुख असणा-या घरांतील मुलांना सर्व प्रकारच्या असुरक्षिततेचा बालपणापासून करावा लागणारा सामना, त्यांपायी त्या मुलांच्या मनांची विस्कटलेली घडी... अशा अनेकानेक कारणांचे एक मोठे मोहोळच ब्रिटनमधील अस्वस्थ तरुणाईच्या अशा बेफाट आणि आतताई वागण्याच्या मुळाशी दिसते, असे विश्लेषण आज तिथे मांडले जाते आहे. अंतर्मुख बनण्यास सर्वांनाच भाग पाडणारे असेच हे वास्तव नाही का ? ■■

# पुन्हा एक वाद धरणाचा

प्रगतीची आस असणा-या विकसनशील राष्ट्रांसाठी ऊर्जेचा प्रश्न महत्त्वाचा आहे. विविध प्रकारचे उद्योग, शेती आणि वाढती लोकसंख्या यांमुळे या देशांची ऊर्जेची गरज वाढतेच आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी अणुऊर्जा, जलविद्युत, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा इत्यादी सर्व मार्गांनी ऊर्जा मिळविण्याचे प्रयत्न या देशांकडून करण्यात येत आहेत. यांतील अणुऊर्जा आणि जलविद्युत यांबाबत चर्चा व वाद जगभरातच चालू आहेत. अणुऊर्जानिर्मितीचा खर्च व निर्मितीप्रक्रियेत आरोग्याला असणारे धोके आणि पाण्यापासून ऊर्जानिर्मिती करण्यासाठी बांधण्यात येणारी मोठी धरणे, त्यामुळे होणारे धरणपरिसरातील नागरिकांचे विस्थापन आणि सभोवतालच्या पर्यावरणाचा होणारा -हास ही प्रमुख कारणे या वादामागे असतात. अलीकडे पेरू देशातील इनामबारी धरणामुळे पुन्हा एकदा मोठ्या धरणांबाबतचा वाद पुढे आला आहे. दोन हजार मेगॅवॅट विद्युतनिर्मितीची क्षमता असणा-या या धरणामुळे विपुल वनसंपत्ती व जैवविविधतेसाठी प्रसिद्ध असणा-या ॲमेझॉनच्या खो-यातील सुमारे ४०० चौरस किलोमीटर क्षेत्र पाण्याखाली येणार असून त्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होणार असल्याचे म्हटले जाते.

या भागात धरण बांधण्याचा निर्णय झाल्यापासून - गेल्या दोन-तीन वर्षांपासून - तेथील नागरिकांनी त्याबाबत आवाज उठविला होता. स्थानिकांचे निषेध, मोर्चे यांमुळे प्रशासनाने हा प्रकल्प सध्या चालू न करण्याचे ठरविले आहे. आता, जलविद्युत क्षेत्रातील कंपन्या, पर्यावरणाच्या आणि मानवाधिकाराच्या क्षेत्रात काम करणा-या संस्था, संघटना आणि सरकार यांनी एकत्र येऊन चर्चा करण्याचा निर्णय घेतला आहे. धरणामुळे किती व कसकशा प्रकारचे नुकसान होऊ शकते याचा अंदाज घेऊन हे नुकसान कसे टाळता येईल, यावर चर्चेत भर देण्यात येणार आहे.



ब्राझील आणि पेरू या दोन देशांदरम्यान या संदर्भातील करार करण्यात आला होता. 'हायड्रोपॉवर सस्टेनेबिलिटी ॲसेस्मेंट प्रोटोकॉल' -नुसार धरण बांधताना प्रत्येक टप्प्यावर धरणाबाबतचा सर्वंकष अभ्यास सादर करणे गरजेचे असते. 'वर्ल्ड कमिशन ऑन डॅम्स' यांच्यातर्फे २०००मध्ये काही मार्गदर्शक तत्त्वे आखून देण्यात आली आहेत. त्यानुसार हा प्रोटोकॉल निश्चित करण्यात आला होता. तथापि, हा प्रोटोकॉल ऐच्छिक असल्याने आणि याबाबतचा अभ्यास सरकार व कंपन्या यांच्याकडून होत असल्याने त्यांना सोयीचे ठरतील असेच निष्कर्ष अभ्यासांमधून मांडण्यात येण्याची शक्यता असते. त्यामुळे, धरणाचे बांधकाम निर्वेधपणे चालू राहू शकते. प्रोटोकॉलचे पालन करणे हे तो मंजूर करणा-या कंपन्यांना सक्तीचे नसल्यामुळे धरणविषयक प्रश्न पुढे आले तरी त्यावर योग्य तोडगा शोधला जाईल, याची शाश्वती वाटत नसल्याने पर्यावरणवादी नागरिकांमध्ये दोन गट पडले आहेत. या प्रोटोकॉलचा वापर मूळ प्रश्न सोडविण्यासाठी न करता जनसंपर्कासाठी म्हणजे एका प्रकारे हा प्रकल्प कसा योग्य आहे हे नागरिकांना समजावून सांगण्यासाठी केला जाईल किंवा कसे अशी शंका उपस्थित करण्यात आली आहे. तर, या प्रोटोकॉलमुळे किमान काही अभ्यास होऊन धरण बांधताना किमान काही निकषांचे पालन केले जाईल, अशी आशा व्यक्त करण्यात आली आहे. प्रोटोकॉलबाबत काही कंपन्यांनीही सकारात्मक भूमिका घेतली आहे. कारण, प्रोटोकॉलमुळे स्थानिकांचे आंदोलन व विरोध कमी होण्यास मदत होईल, असे त्यांना वाटते.

दरम्यान, धरणग्रस्तांचा विरोध कायम असून पर्यावरणाची कोणतीही हानी होऊ नये, अशी त्यांची भूमिका आहे. पर्यावरणविषयक तसेच पुनर्वसनविषयक प्रश्नांचा गांभीर्याने विचार करून धरणग्रस्तांनीच आपल्या हक्कांसाठी जागरुक राहिले पाहिजे. तसेच, सरकारवर दबाव आणून आपल्या मागण्या रेटण्याचीच गरज असते, असे मत स्थानिकांकडून मांडण्यात येते. या पार्श्वभूमीवर या धरणाबाबतचा सर्वंकष अभ्यास कसा व कोणाच्या पुढाकाराने करण्यात येणार आहे, त्यावर धरणाला असलेला विरोध मावळेल किंवा कसे हे अवलंबून असणार आहे. ■■

(पृष्ठ १८ वरून)

कारणपरत्त्वे अथवा वारंवार होणारे भूस्खलन हे अस्थिर भूस्तराचे द्योतक होय. हिमालयाच्या पर्वतरांगांमधील बहुतांश डोंगरउतार हे अशा अस्थिर भूस्तरांवर तोललेले आहेत. पर्वतीय प्रदेशांतील भूस्तरांच्या अस्थिरतेमध्ये वाढ घडून येण्यास कारणभूत ठरणारे मुख्य घटक दोन. कातळाला पडलेल्या भेगांमधून भूगर्भात झिरपणा-या पाण्याचा वाढणारा दाब भूस्तरातील अंतर्गत रचनेत बदल घडवून आणतो, हा झाला त्यांतील पहिला घटक. तर, डोंगरउतारांच्या कोनात बदल होणे, हा झाला दुसरा घटक. कोन बदलल्याने डोंगरांचे उतार अधिक तीव्र बनतात. डोंगरउतारांची अस्थिरता त्यांपायी अधिक वाढते. डोंगरउतारांच्या तीव्रतेत अवचितच बदल घडून आल्याने डोंगरउतारांची अस्थिरता वाढण्याची प्रक्रिया अधिकच गतिमान बनते. भूपृष्ठीय दळणवळणाच्या सुकरतेसाठी डोंगराळ आणि पर्वतीय प्रदेशांतील रस्त्यांची रुंदी वाढविणे अनिवार्य ठरते. रस्तारुंदी घडवून आणावयाची तर डोंगरांचे कडे तासणे अपरिहार्य होऊन बसते. डोंगरकडे आणि उतार तासले की डोंगरांच्या उतारांचे कोन तीव्र बनतात. उतारांचे कोन तीव्र बनले की अशा डोंगरउतारांच्या अस्थिरतेमध्ये भर पडते. डोंगराळ प्रदेशांत रस्तेनिर्मिती तसेच रस्ता रुंदीकरणाचे प्रकल्प राबविताना डोंगर फोडण्यासाठी भू - सुरुंगांचा वापर साहजिकच केला जातो. सुरूंगांच्या स्फोटांपायी हादरे बसून, कालौघात डोंगर तसेच डोंगरउतारांवर निसर्गतःच तयार झालेले तडे आणि प्रस्तरांतील चिरा अधिकच रुंदावतात. रुंदावलेल्या या भेगांमधून पावसाचे पाणी भूस्तरांमध्ये झिरपण्याची प्रक्रिया अधिकच सघन बनते. अशा प्रकारे झिरपलेल्या पाण्यामुळे भूस्तरांमधील अंतर्गत दाब वाढून त्यांची अंतर्रचना ठिसूळ बनते. साहजिकच, असे भूस्तर अस्थिर बनतात आणि भूस्खलनाच्या प्रक्रियेची तीव्रता आणि वारंवारता वाढू लागते.

हिमालयासारख्या, पर्यटकांचे आकर्षण केंद्र असणा-या पर्वतातील अस्थिर भूस्तर, भूस्खलनप्रवण असे डोंगरउतार, पर्यटन आणि पर्यावरण यांच्या परस्परसंबंधातील हा एक अतिशय महत्त्वाचा आणि तितकाच संवेदनशील पैलू उत्तराखंडाच्या निमित्ताने सामोरा आलेला आहे. या पैलूबाबत तितकेच सर्वंकष आणि संवेदनशील चिंतन-मनन होणे गरजेचे ठरते. ■■



(पृष्ठ १४ वरून)

युद्धग्रस्त देशांमध्ये शिक्षणाच्या संदर्भातील एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे तेथील युवकांची कौशल्ये वाढून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत तेथील शिक्षण अपुरे पडते. त्यामुळे गरिबी दूर होण्याच्या दिशेने पावले पडत नाहीत. दुसरे म्हणजे, शांततेच्या दिशेने कृती व्हावी असे शिक्षण मिळणेही गरजेचे असते. पण, काही युद्धग्रस्त देशांमधील शाळांमधून सामाजिक भेद, असहिष्णुता व गैरसमज वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे सामाजिक अशांतता निर्माण होते. शांतता व शिक्षण यांचा परस्परसंबंध लक्षात घेऊन तशा योजना आखल्या जाणे गरजेचे असते. मानवाधिकारांचे संरक्षण हा विषयदेखील अशा देशांमध्ये महत्त्वाचा ठरायला हवा. शिक्षणविषयक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी युद्धग्रस्त देशांमधील सरकारांनी त्वरित कृती करणे गरजेचे आहे. शिक्षणावर विपरीत परिणाम घडू नयेत, या उद्दिष्टाने संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध संस्थांबरोबर काम करून या देशांनी मानवाधिकारांचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. युद्धग्रस्त देशांमध्ये कोणत्याही प्रकारचे मदतकार्य करताना मानवीय दृष्टिकोणाबरोबरच शांतता प्रस्थापित करण्यामधील शिक्षणाची भूमिका समजून घेतली पाहिजे. सर्वसमावेशक शिक्षणाचे महत्त्व येथे अधोरेखित करणे गरजे ठरते.

या अहवालाने नमूद केले आहे की, विसाव्या शतकात तसेच चालू शतकाच्या पहिल्या दशकातही जगाने अनेक संघर्ष अनुभवले आहेत. आता जगाला शांततेकडे वाटचाल करायची असेल परस्परांविषयी आदर व सहिष्णुता वाढीस लागण्यासाठी शिक्षण व शाळा यांचा उपयोग करून घेतला पाहिजे. जग बहुसांस्कृतिक असून त्या विविधतेचा उपयोग मानवाच्या सर्वंकष विकासासाठी शिक्षणाच्या माध्यमातून कसा करून घेता येईल याचा विचार करता येणे शक्य आहे. धार्मिक, वांशिक, भाषिक भेद दूर करण्यासाठी शाळा हे केंद्र ठरू शकते. जागतिक नागरिकाचे मन घडविण्याचा प्रयत्न चालू शतकातील शिक्षणाने करायला हवा. सर्वांसाठी शिक्षण ही आवश्यक बाब आहेच, त्याचबरोबर या शिक्षणामुळे देशोदेशींची मने जोडली गेली तर जगात शांतता नांदू शकेल. ■■

## जिकडेतिकडे

# ‘ट्विट’ करा आणि डेंगीचा प्रसार रोखा!

हाती इंटरनेट सेवा असणा-या कुणालाही अगदी बसल्याबसल्या व सहजपणे आपली मते, विचार, शंका काही क्षणांतच जगभरात पोहचविता येण्याची सोय ‘ट्विट्र’ने उपलब्ध करून दिली आहे. तीही विनामूल्य! ‘ट्विट्र’ ही इंटरनेटवरील एसएमएस सेवा असून ‘ट्विट्र’वरील एसएमएस म्हणजे ‘ट्विट’ होय. म्यानमार, इजिप्त, ट्यूनिशिया इत्यादी देशांमध्ये झालेल्या लोकशाही चळवळींना इंटरनेटचा - सोशल मीडियाचा - मोठाच उपयोग झाला. आता आरोग्याच्या क्षेत्रातही त्याचा उपयोग होतो आहे. ‘माझ्या आईला डेंगीची लागण झाली असल्याची शक्यता आहे,’ असे ‘ट्विट’ ब्राझीलमधील रिओ द जानेरो येथील एका महिलेने केले. तर, साओ पावलो येथील एका व्यक्तीने ‘मला डेंगी झाला असावा असे वाटते,’ असे ‘ट्विट’ केले. तसे पाहता अत्यंत साध्या वाटणा-या या ‘ट्विट्स्’मुळे संबंधित आरोग्ययंत्रणेला डेंगीचा प्रसार रोखण्यासाठी झटपट कृती करता आली. डेंगीची साथ झपाट्याने पसरते आणि डेंगीच्या रुग्णांची संख्या वाढू लागल्यावर डेंगीचा प्रसार रोखणे कठीण होत जाते. डेंगीच्या रुग्णांकडून प्रशासनाकडे जेवढ्या लवकर माहिती पोहचू शकेल, तेवढी ही साथ आटोक्यात आणणे सोपे जाते.

ब्राझीलमध्ये दरवर्षीच डेंगीची साथ येते. पण ती नेमकी कोणकोणत्या भागांत आहे हे कळेपर्यंत बराच वेळ निघून जातो. तोपर्यंत साथ पसरत जाते व प्रशासनासमोर आव्हान उभे ठाकते. हा प्रश्न लक्षात घेऊन ब्राझीलमधील दोन संस्थांनी एक सॉफ्टवेअर तयार केले. त्यामुळे नागरिकांनी डेंगीच्या उद्भवाबाबत ‘ट्विट’ केले की त्या भागांतील आरोग्यविषयक माहितीच्या साठ्याचा उपयोग करून प्रशासनाला झटपट योग्य निर्णय घेणे शक्य बनते. ब्राझीलमध्ये इंटरनेट सेवेचा विस्तार मोठ्या प्रमाणावर होत असून ती वापरणा-यांची संख्याही वाढते आहे, हे इथे उल्लेखनीय.



या नव्या सॉफ्टवेअरमुळे ‘सोशल नेटवर्किंग साइट’मधून ‘डेंगी’ हा शब्द ‘फिल्टर’ करून बाजूला केला जातो. त्याच वेळी हे ‘ट्विट’ कुठून केले ते समजून घेता येते. डेंगीच्या संदर्भातील जाहिराती, आरोग्यविषयक विनोद आणि व्यक्तिगत माहिती यांतील नेमका फरक वाक्यरचनेवरून ओळखण्यात येऊन व्यक्तीच्या संदर्भातील ‘डेंगी’ शब्द या सॉफ्टवेअरच्या अभ्यासात विचारात घेतला जातो. या अभ्यासात पहिल्या टप्प्यात जानेवारी ते मे २००९ या काळातील २४४७ ‘ट्विट्स्’ तपासण्यात आले होते. वेबसायन्सच्या संदर्भात जर्मनीत झालेल्या एका परिषदेत हा अभ्यास सादर करण्यात आला होता. ब्राझीलच्या आरोग्यखात्याने डेंगीविषयक आरोग्यसेवा उपलब्ध करून दिलेले भाग आणि त्या भागांतील ‘ट्विट्स्’ यांत सहसंबंध असल्याचे तेव्हा लक्षात आले होते. आता, डिसेंबर २०१० ते एप्रिल २०११ या काळातील सुमारे पावणेदोन लाख ‘ट्विट्स्’च्या संदर्भात पुन्हा असा अभ्यास करण्यात येणार आहे. आजचे युग हे तंत्रज्ञानाचे व जाहिरातीचे असून ‘‘ट्विट करा आणि डेंगीचा प्रसार रोखा, अशी जाहिरात आता आढळली तर नवल वाटायला नको! ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

### प्रमुख संदर्भ

**(A) Magazines :-**
(1)NewScientist 16 July 2011 (2) Nature Vol 474, 23 June 2011(3) Current Science, Volume 100, Number 11, 10 June 2011(4) sciencefocus.com, July 2011
**(B) Books/Reports :-**
(1) The hidden crisis : Armed conflict and education, Education for All Global Monitoring Report 2011, UNESCO Publishing 2011.
(2) World Development Report - 2011; Conflict, Security, and Development, The World Bank.
**(C) Websites :-** (1) www.bbcnews.co.in (2)www.chinadaily.com.cn /hkeedition/2011 (3) www.bloomberg.com/apps/news
(4) www.knowledgeatwharton.com.cn (5)www.chinastakes.com
(6) www.cato.org/pubs/ (7) The U. K. Riots And The Coming Global Class War, http://www.forbes.com.

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.



**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन**
**आता पुनर्मुद्रित स्वरूपात**

**भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज**

## Poverty in India

**लेखक**

वि.म. दांडेकर नीळकंठ रथ

पृष्ठे १४० किंमत : २००/- रुपये

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध स्तरांतील वाचकांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये
**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट
**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट
**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)